

# वेध... भुयारी मेट्रोचे!



## ■ मुंबईत धावणार भारतातील सर्वात लांब भुयारी रेल्वे
## ■ बीकेसी ते आरे दरम्यानचा पहिला टप्पा डिसेंबरपर्यंत सेवेत

गिरीश चित्रे/मुंबई

**मुंबईची वाहतूककोंडी फोडण्यासाठी कोस्टल रोड प्रकल्प महत्त्वपूर्ण ठरणार आहे. कोस्टल रोड प्रकल्पाची संपूर्ण जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडणाऱ्या मुंबई महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्त अश्विनी भिडे यांच्या मार्गदर्शनाखाली मेट्रो रेल्वे ३चे जाळे विस्तारले जात आहे. मेट्रो रेल्वे ३च्या प्रत्यक्ष कामाला ऑक्टोबर २०१६ पासून सुरुवात झाली. कोलकाता, दिल्ली व चेन्नई येथे भुयारी मेट्रो रेल्वे प्रवासी सेवेत आहे. मात्र भारतातील सर्वात लांब भुयारी रेल्वे ही मुंबईतील असून, भुयारी रेल्वेचा प्रत्यक्ष अनुभव मुंबईकरांसह प्रवाशांना कधीपर्यंत घेता येईल, स्थानकात काय सुविधा, याबाबत दैनिक 'नवशक्ति'ने घेतलेला हा आढावा.**

मुंबईतील वाहतूककोंडी फोडण्यासाठी व प्रवाशांना जलदगतीने प्रवास करता यावा, यासाठी घाटकोपर ते वर्सोवा पहिली मेट्रो धावली. त्यानंतर मुंबईतील वाहतूककोंडी लक्षात घेता मेट्रो रेल्वेचे जाळे विस्तारले गेले. मेट्रो रेल्वे ३ या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामाला ऑक्टोबर २०१६ पासून सुरुवात झाली. मेट्रो रेल्वे प्रकल्पात एकूण २६ स्थानके असून, कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ मार्गिकेतील पहिले स्थानक कफ परेड, तर शेवटचे स्थानक आरे आहे. २६ स्थानकांपैकी आरे हे एक स्थानक जमिनीवर असून, बाकी सर्व स्थानके भुयारी असणार आहेत. विशेष म्हणजे बीकेसी ते आरे हा १२.४४ किमीचा पहिला टप्पा डिसेंबर २०२३ पर्यंत प्रवाशांच्या सेवेत आणण्याचे नियोजन असल्याचे मुंबई मेट्रो रेल्वे कॉर्पोरेशनच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यांनी सांगितले.

दरम्यान, पहिल्या टप्प्यात एकूण १० स्थानकांचा समावेश आहे. बीकेसी, विद्यानगरी, सांताक्रुझ, डोमेस्टिक एअरपोर्ट, सहार रोड, इंटरनॅशनल एअरपोर्ट, मरोळ, एमआयडीसी, सिप्झ व आरे ही स्थानके असणार आहेत, तर प्रकल्पाचा उर्वरित व दुसरा टप्पा जून २०२४ मध्ये सुरू करण्याचे नियोजन आहे. दुसऱ्या टप्प्यात २१.३५ किमी असलेल्या बीकेसी ते कफ परेडपर्यंतचा मार्ग मुंबईकरांच्या सेवेत आणण्याचे नियोजन असल्याचे अश्विनी भिडे यांनी सांगितले. दरम्यान, आंध्र प्रदेशातून दोन मेट्रो गाड्या दाखल झाल्या आहेत.

मेट्रो रेल्वे ३ ही भुयारी रेल्वे असून, याचे तिकीट प्रवाशांच्या खिशाला परवडणारे असेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच मेट्रो-३ प्रकल्पामुळे पर्यावरणाला फायदा होणार असून, दिवसाला वाहनांच्या फेऱ्यांमध्ये ६.६५ लाखांनी घट होईल. तसेच इंधनाचा



वापरही कमी होऊन दिवसाला ३.५४ लाख लिटर इंधनाची बचत होईल. यूएनएफसीसीने नमूद केलेल्या माहितीनुसार, या मार्गिकेमुळे दरवर्षी २.६१ लाख टन सीओ२ उत्सर्जन कमी होईल. मेट्रो -३ ज्या भागातून मार्गक्रमण करणार आहे, त्या भागातील रस्त्यावरील रहदारीत ३५ टक्के घट होईल.

मुंबई मेट्रो मार्ग ३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) ही मुंबईची पहिली आणि एकमेव पूर्णपणे भुयारी मेट्रो आहे. शहरात वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच वाहतुकीच्या पर्यायी सुविधेसाठी महत्त्वाचा असा हा मेट्रो ३ चा प्रकल्प आहे. मेट्रो ३ च्या माध्यमातून दररोज १७ लाख प्रवासी प्रवास करतील. एकाच वेळी २५०० प्रवासी मेट्रोतून प्रवास करू शकतील. मेट्रो-३ कुलाबा-वांद्रे-सिप्झ हा ३३.५ कि.मी. लांबीचा भुयारी मार्ग आहे. या मार्गिकेमुळे ३० हून अधिक शैक्षणिक संस्था, १३ रुग्णालये, १४ धार्मिक स्थळे आणि ३० हून अधिक मनोरंजन सुविधांमध्ये सहज प्रवेश उपलब्ध होईल. उपनगरीय रेल्वेशी न जोडलेल्या काळबादेवी, गिरगाव, वरळी, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळांसारख्या भागांना मेट्रो-३ मार्गिकेमुळे जोडणी मिळणार आहे. तसेच इतर मेट्रो मार्ग, मोनोरेल, उपनगरीय रेल्वे आणि एसटी बस सेवांशी एकत्रित जोडणी दिली जाणार आहे. दरम्यान, मुंबई मेट्रो-३ प्रकल्पासाठी सुरुवातीला एकूण २३,१३६ कोटींची तरतूद करण्यात आली होती. मात्र सद्यस्थितीत प्रकल्पावर एकूण अंदाजे रु. ३७,२७५ कोटींचा खर्च होणे अपेक्षित आहे.

### प्रवाशांसाठी या सुविधा

सरकते जिने (एस्केलेटर), उद्वाहक (लिफ्ट), प्लॅटफॉर्म स्क्रीन दरवाजे आणि प्रवासी माहिती डिस्प्लेची सुविधा, दिव्यांग प्रवाशांसाठी व्हिलचेअरसाठी आरक्षित जागा, स्वच्छतागृह, विशेष म्हणजे महिलांसह प्रथमच पुरुषांच्या स्वच्छतागृहांत लहान बाळांसाठी डायपर बदलण्याची सोय, स्थानकांवरील गर्दीच्या वेळी आवश्यकतेनुसार तेथील एअरकंडिशन (हवेची स्थिती) आणि दिव्यांच्या उपलब्धतेत बदल या सुविधा पुरवण्यात येतील.

### स्थानके सब-वेशी जोडणार

मेट्रो रेल्वे ३ च्या माध्यमातून दररोज १७ लाख प्रवासी ३ ते ४ मिनिटांच्या अंतराने प्रवास पूर्ण करतील. तसेच मेट्रो रेल्वेमधून उतरल्यावर इच्छीत स्थळी जाण्यासाठी सीएसएमटी मेट्रो स्थानक, एअरपोर्ट मेट्रो स्थानकप्रमाणे इतरही काही स्थानकांना सब-वे मार्गाशी जोडले जाणार असून, यामुळे प्रवाशांना त्यांच्या इच्छित स्थळी, संबंधित कार्यालयामध्ये थेट जाणे सोयीचे होणार आहे.

### कंपन्यांना ब्रँडिंगसाठी जागा!

मुंबई मेट्रो-३ मार्गाकरिता मेट्रो तिकिटा व्यतिरिक्त स्थानक नाम अधिकार, कंपन्यांना ब्रँडिंगसाठी स्थानक परिसरात रिटेलिंगसाठी जागा, ट्रेन मध्ये होणाऱ्या घोषणा आणि स्थानकांच्या नकाशांमध्ये कंपन्यांच्या नावाचा उल्लेख या माध्यमातून नॉन-फेअर बॉक्समार्फत महसूल वाढीचे नियोजन आहे.

### उपनगरीय रेल्वे स्थानकाशी अंतर्गत जोडणी

- चर्चगेट मेट्रो स्थानक - चर्चगेट पश्चिम रेल्वे स्थानक
- सीएसएमटी मेट्रो स्थानक - सीएसएमटी मध्य व हार्बर रेल्वे स्थानक
- ग्रँट रोड मेट्रो स्थानक - ग्रँट रोड पश्चिम रेल्वे स्थानक
- मुंबई सेंट्रल मेट्रो स्थानक - मुंबई सेंट्रल पश्चिम रेल्वे स्थानक आणि एसटी बस डेपो
- महालक्ष्मी मेट्रो स्थानक - महालक्ष्मी मोनोरेल स्थानक
- दादर मेट्रो स्थानक - दादर पश्चिम रेल्वे स्थानक
- बीकेसी मेट्रो स्थानक - मेट्रो मार्ग-२बी (डी. एन. नगर - मंडाले)
- मरोळ नाका - मेट्रो मार्ग-१ (घाटकोपर ते वर्सोवा)

